# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:27.08.2025** **वार:बुधवार**

---

1. जम्मू आणि काश्मीरमध्ये अविरत पावसामुळं जम्मू विभागात पूर आणीबाणी
2. पंतप्रधानांच्या हस्ते 'मेड इन इंडिया' बॅटरी इलेक्ट्रिक वाहन 'ई-वितारा' आणि हायब्रिड बॅटरी इलेक्ट्रोड प्लांटचं उद्घाटन
3. पंतप्रधान उद्यापासून जपान आणि चीनच्या अधिकृत दौऱ्यावर
4. महाराष्ट्रात गणेश उत्सवाचा उत्साह आणि
5. राजस्थानात सापडले जुरासिक काळातील दुर्मिळ मगरीसारख्या प्रजातीचे जीवाश्म अवशेष

**जम्मू आणि काश्मीर-पाऊस**

जम्मू आणि काश्मीरमध्ये अविरत पावसामुळे जम्मू विभागात पूर आणीबाणी निर्माण झाली आहे. यामध्ये किमान 10 जणांचा मृत्यू झाला आहे. माता वैष्णोदेवी मंदिराची यात्रा स्थगित करण्यात आली आहे. त्रिकुटा टेकड्यांवरील मंदिराकडं जाणाऱ्या मार्गावर भूस्खलनामध्ये सहा जणांचा मृत्यू झाला आणि 18 जण जखमी झाले आहेत. हिमकोटी मार्ग देखील बंद करण्यात आला आहे. दोडा जिल्ह्यातही चार जणांचा मृत्यू झाला आहे. आपत्कालीन सेवा वगळता सर्व सरकारी कार्यालयं आज बंद राहतील. तावी, चिनाब, नेरू आणि कलनाई यासारख्या प्रमुख नद्यांची पाणी पातळी वाढली आहे. हवामान खात्यानं सतत पाऊस पडण्याचा अंदाज वर्तवला असून आणखी पूर येण्याची शक्यता वाढली आहे.

**पंतप्रधान-बॅटरी कारखाना**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुजरातमधील हंसलपूर इथं मेड इन इंडिया बॅटरी इलेक्ट्रिक व्हीकल 'ई-वितारा' या वाहनाला काल हिरवा झेंडा दाखवला. युरोप आणि जपानसारख्या प्रमुख बाजारपेठांसह 100 हून अधिक देशांमध्ये ही वाहनं निर्यात केली जातील. स्वच्छ ऊर्जेमध्ये स्वयंपूर्णतेकडं एक मोठी झेप घेत, पंतप्रधानांनी हंसलपूर इथल्या TDS लिथियम-आयन बॅटरी प्लांटमध्ये हायब्रिड बॅटरी इलेक्ट्रोडचं स्थानिक उत्पादन सुरू करून भारताच्या बॅटरी इकोसिस्टीमच्या पुढील टप्प्याचाही शुभारंभ केला. बॅटरी मूल्याच्या ऐंशी टक्क्यांहून अधिक उत्पादन आता भारतात केलं जाईल....

**भारत में बने इलेक्ट्रिक व्हीकल्स सौ देशों को एक्सपोर्ट किए जाएंगे। साथ ही हाइब्रिड बैटरी इलेक्ट्रोड मैन्युफैक्चरिंग भी स्टार्ट हो रही है। इस दिन भारत और जापान की फ्रेंडशिप को भी नया आयाम दे रहा है। मैं सभी देशवासियों को जापान को सुजुकी कंपनी को बधाई देता हूं।**

**मोदी-दौरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्यापासून जपान आणि चीनच्या अधिकृत दौऱ्यावर जाणार आहेत. ते जपानचे पंतप्रधान शिगेरू इशिबा यांच्यासोबत 15 व्या भारत-जपान वार्षिक शिखर परिषदेत सहभागी होतील अशी माहिती परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी काल माध्यमांना दिली. चीनमध्ये, पंतप्रधान 31 ऑगस्ट आणि 1 सप्टेंबर रोजी तियानजिन इथं होणाऱ्या शांघाय सहकार्य संघटनेच्या राष्ट्रप्रमुखांच्या पंचविसाव्या बैठकीत सहभागी होतील.

**गणेशोत्सव**

महाराष्ट्रात, गणरायाच्या आगमनापासून ते विसर्जनापर्यंत दहा दिवसांचा उत्सव सुरळीत पार पाडण्यासाठी ठिकठिकाणचं स्थानिक प्रशासन, पोलीस यंत्रणा सज्ज झाल्या आहेत. सार्वजनिक गणेशोत्सवाची मोठी परंपरा पुण्याला लाभली आहे. एक वृत्तांत...

**शतकोत्तर सुवर्ण महोत्सवाकडे वाटचाल करणाऱ्या, सार्वजनिक गणेशोत्सवाला राज्य सरकारनं, यंदा राज्य महोत्सवाचा दर्जा दिल्यामुळे सार्वजनिक गणेश मंडळात एक नवा उत्साह पहायला मिळत आहे. भाद्रपद महिन्यात, शुद्ध पक्षातल्या गणेश चतुर्थीला पार्थिव गणेशाची स्थापना करून, पुढे काही दिवस त्याची उपासना करण्याचे व्रत, परंपरेनं घरोघर सुरू होतं. या परंपरेला लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी सार्वजनिक स्वरूप देत, घराघरात होणारा हा उत्सव स्वातंत्र्यलढ्यासाठी सार्वजनिक स्वरूपात केला. पुणे शहराला सार्वजनिक गणेशोत्सवाची मोठी परंपरा लाभली असून मानाचे आणि प्रतिष्ठित असे गणपती पाहण्यासाठी राज्यभरातील भाविक पुण्यात येत असतात. पुण्यात असलेल्या अनेक गणपती मंदिरांमध्ये गेल्या रविवारी प्रतिपदेपासून भाद्रपदी गणेश जन्मोत्सव सुरू झाला आहे. आज या मंदिरांमध्ये आपापल्या प्रथेनुसार दुपारी किंवा संध्याकाळी गणेश जन्म कीर्तन होणार आहे. या उत्सवांची सांगता उद्या होईल. तर अनंत चतुर्दशी पर्यंत चालणाऱ्या सार्वजनिक उत्सवाला यंदा अकरा दिवस मिळाले आहेत. पारंपारिक देखाव्यांसह, समाज प्रबोधन करणारे, उद्बोधन करणारे जिवंत देखावे ही गेल्या काही वर्षांपासून सादर केले जात आहेत. आकाशवाणी बातम्यांसाठी पुण्याहून, सुहास देशपांडे.**

**राष्ट्रपती-गणेश चतुर्थी**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गणेश चतुर्थीनिमित्त देशवासीयांना शुभेच्छा दिल्या आहेत. लोकांनी पर्यावरण संरक्षणासह हा सण साजरा करावा आणि स्वच्छ, हरित आणि समृद्ध राष्ट्र निर्माण करण्यासाठी योगदान देण्याचं आवाहन देखील त्यांनी केलं आहे.

**जीवाश्म**

राजस्थानातील जैसलमेर जिल्ह्यातील मेघा गावात संशोधकांना जुरासिक काळातील एका दुर्मिळ मगरीसारख्या प्रजातीचे जीवाश्म अवशेष सापडले आहेत. फायटोसॉर म्हणून ओळखले जाणारे हे जीवाश्म दीड ते दोन मीटर लांबीचे आहे आणि ते 20 कोटी वर्षांहून अधिक जुनं असण्याची शक्यता संशोधकांनी वर्तवली आहे. राज्याच्या जल विभागात कार्यरत वरिष्ठ जलभूगर्भशास्त्रज्ञ डॉ. नारायणदास इंखिया आणि त्यांच्या चमूनं हा शोध लावला. फायटोसॉर हा अर्ध-जलचर प्राणी होता, जो नदीत आणि जमिनीवरही राहत होता, नंतर तो आता सापडणाऱ्या मगरींमध्ये विकसित झाला अशी माहिती भूगर्भशास्त्रज्ञ सी पी राजेंद्रन यांनी दिली. जैसलमेरच्या भूगर्भीय रचनेमध्ये जुरासिक युगात डायनासोरची भरभराट झाली असं संशोधकांनी सांगितलं.

**पाकिस्तान-पूरग्रस्त**

भारतामधून धरणं आणि नद्यांमधून सखल भागात पाणी सोडल्यानंतर पाकिस्तानमध्ये हजारो लोकांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आलं आहे. तत्पूर्वी भारतानं पाकिस्तानला सीमापार पूर येण्याची शक्यता असल्याबद्दल इशारा दिला होता. पंजाब प्रांतातील कसूर जिल्ह्यातील चौदा हजारहून अधिक लोकांना बाहेर काढलं आहे, तर भारतीय सीमेजवळील बहावलनगर शहरातून अंदाजे नव्वदहजार लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आलं आहे.

**भारत-कुवैत-एफओसी**

भारत आणि कुवेत यांनी काल नवी दिल्लीत परराष्ट्र कार्यालय स्तरावर सल्लामसलतीची सातवी फेरी आयोजित केली. यामध्ये दोन्ही बाजूंनी द्विपक्षीय संबंधांचा आढावा घेतला आणि अनेक क्षेत्रांमध्ये धोरणात्मक भागीदारी आणखी भक्कम करण्याच्या मार्गांवर चर्चा केली. परराष्ट्र कार्यालय स्तरावरील सल्लामसलतीची पुढील फेरी कुवेतमध्ये होणार आहे.

**गहू-साठा-मर्यादा**

अन्न सुरक्षिततेचं व्यवस्थापन आणि साठेबाजी आणि बेकायदेशीर सट्टेबाजी रोखण्यासाठी सरकारनं गव्हाच्या साठ्यावर मर्यादा लागू केल्या आहेत. सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधील व्यापारी आणि घाऊक तसंच, किरकोळ विक्रेते, आणि प्रक्रिया करणाऱ्यांना ही साठा मर्यादा लागू असेल. ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयानं सांगितले की व्यापारी आणि घाऊक विक्रेते यांच्यासाठी साठा मर्यादा तीन हजार मेट्रिक टनांवरुन दोन हजार मेट्रिक टन करण्यात आली आहे. किरकोळ विक्रेत्यांसाठी साठा मर्यादा आठ मेट्रिक टन असेल.

**GST**

केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्क मंडळानं लोकांना GST दरांबाबत अनुमान लावणं टाळण्याचं आवाहन केलं आहे. अकाली अनुमानांमुळं निराधार अफवा निर्माण होतात आणि बाजारात अस्थिरता निर्माण होऊ शकते. 3 आणि 4 सप्टेंबरला होणाऱ्या GST परिषद बैठकीनंतर होणाऱ्या अधिकृत घोषणांची वाट पाहावी असा सल्ला मंडळानं दिला आहे.

**मुंबई-कोकण सागरी मार्ग**

महाराष्ट्र सरकारनं मुंबई ते रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी प्रवासी सागरी वाहतूक मार्गाला मान्यता दिली आहे. या सेवेमुळं मुंबई ते रत्नागिरी प्रवास तीन तासांनी आणि सिंधुदुर्गपर्यंत पाच ते सहा तासांनी कमी होईल.

**अध्यात्मिक-परिषद**

मध्य प्रदेश सरकार आज उज्जैनमध्ये जागतिक अध्यात्मिक परिषद आयोजित करणार आहे. पर्यटन मंत्रालयाच्या सहकार्यानं हा कार्यक्रम आयोजित केला आहे. भारत आणि परदेशातील अध्यात्मिक गुरु, विचारवंत आणि दूरदर्शी यांच्यासह 300 हून अधिक मान्यवर यामध्ये सहभागी होणार आहेत. अध्यात्मिक पर्यटनाला चालना, सांस्कृतिक वारशाचं जतन आणि जबाबदार आदरातिथ्याबाबत संवाद वाढविणं अशी या परिषदेची उद्दिष्टं आहेत.

**टेनिस**

अमेरिकन खुल्या जागतिक टेनिस स्पर्धेत माजी अग्रमानांकित पोलंडच्या इगा स्विएटेकनं सलग सातव्यांदा पहिली फेरी पार करत काल कोलंबियाच्या एमिलियाना अरांगोचा 6-1, 6-2 असा पराभव करून दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. तिची पुढील लढत आज नेदरलँड्सच्या सुझान लॅमेन्सशी होईल. सेरेना विल्यम्सप्रमाणं एकाच वर्षात विम्बल्डन आणि अमेरिकन खुली जागतिक टेनिस स्पर्धा जिंकण्याचं इगाचं स्वप्न आहे.

**पंजाब-पूर**

पंजाबमधील रावी, बियास आणि सतलज नद्यांच्या सीमेवरील काही भागात पूर परिस्थिती गंभीर होत आहे. रणजित सागर धरण आणि पोंग धरणांनी कमाल क्षमता गाठली असून गेल्या आठवड्यापासून भाक्रा धरणातून नियंत्रित पद्धतीनं पाणी सोडण्यात आलं आहे. सखल भागात राहणाऱ्या लोकांना सुरक्षित ठिकाणी किंवा मदत छावण्यांमध्ये जाण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. बाधित क्षेत्रात आतील भागात अडकलेल्यांना सैन्याचे जवान, बीएसएफ, एनडीआरएफ आणि पंजाब पोलिस मदत करत असून गरज असेल तिथं हेलिकॉप्टर्स तैनात करण्यात आली आहेत. 30 ऑगस्टपर्यंत सर्व शाळांना सुट्ट्या देण्यात आल्या आहेत.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**